# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.08.2024** **वारःमंगळवार**

---

1. मित्र या राज्य सरकारच्या सल्लागार संस्थेनं जनतेसाठीच्या मूलभूत क्षेत्रांच्या विकासावरही लक्ष केंद्रित करावं-मुख्यमंत्र्यांचं आवाहन
2. राज्यात उदंचन जलविद्युत विकसित करण्यासंदर्भात 24 हजार कोटी रुपयांचे महत्त्वपूर्ण सामंजस्य करार
3. शैक्षणिक संस्थांसाठीच्या राष्ट्रीय गुणवत्ता यादीत आयआयटी मुंबई तिसऱ्या क्रमांकावर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठालाही राज्य पातळीवरील विद्यापीठ श्रेणीत मानांकन आणि
4. राज्य शिक्षण मंडळाच्या पुढच्या वर्षी होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या संभाव्य तारखा जाहीर

**मुख्यमंत्री मित्र बैठक**

महाराष्ट्र परिवर्तन संस्था अर्थात मित्र या संस्थेनं राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरवर नेण्याच्या उद्दीष्टाबरोबरच कृषी, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, पायाभूत सुविधा, ऊर्जा या क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रीत करावं असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. यामुळे नागरिकांना फायदा होईल आणि राज्याच्या विकासालाही मोठा हातभार लागेल, असं मुख्यमंत्री मित्र संस्थेच्या नियामक मंडळाच्या बैठकीत काल म्हणाले. यावेळी जिल्हास्तरीय विकासाला चालना देणारा संस्थात्मक बळकटीकरण प्रकल्प आणि कोल्हापूर सांगली जिल्ह्यातल्या पूरस्थिती नियंत्रणासाठीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम यांचा प्रारंभ करण्यात आला. ग्रीन हायड्रोजनला प्राधान्य देतानाच नारपार, मराठवाडा वॉटरग्रीड, पैनगंगा, वैनगंगा, नळगंगा सारख्या जिल्ह्यांना वरदान ठरणाऱ्या प्रकल्पांच्या पूर्णतेसाठी 'मित्र'ने चांगलं काम करावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मित्र संस्थेनं पुण्यातल्या गोखले इन्स्टीट्यूटसह आयआयएम नागपुर, आयआयटी मुंबई, मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थांसोबत माहितीच्या आदानप्रदानाबाबतचे सामंजस्य करार केले. पिरामल फाऊंडेशन मित्र संस्थेला प्रशिक्षणासाठी सहकार्य करणार आहे.

**वन्यजीव मंडळ**

नागपूर जिल्ह्यात पेंच इथं पाणमांजर, गिधाड, रानम्हैस यांचं प्रजनन केंद्र उभारण्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली आहे. राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत ते काल बोलत होते. सर्पदंशावर तत्काळ उपचार व्हावेत यासाठी क्लिनिक ऑन व्हील हा उपक्रम सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. तसंच सर्पदंशामुळे मृत्यू झालेल्या शेतमजुरांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विम्यातून लाभ द्यावा असंही सांगितलं. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तिच्या कुटुंबातील सदस्याला वनमजूर म्हणून सेवेत सामावून घेण्याचा निर्णय यावेळी मुख्यमंत्र्यांनी घेतला. जागतिक तापमान वाढ रोखण्यासाठी वृक्षारोपण हा प्रभावी उपाय

असून केंद्र सरकारच्या एक पेड माँ के नाम या उपक्रमाची राज्यात जास्तीतजास्त जनजागृती करावी आणि लावलेल्या रोपाचं संगोपन करावं असं त्यांनी सांगितलं. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार या बैठकीत दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

**<u>करार</u>**

राज्यात उदंचन जलविद्युत विकसित करण्यासंदर्भात जलसंपदा, महाजनको, द टाटा पॉवर लिमिटेड आणि अवाडा ग्रुप यांच्यामध्ये काल सामंजस्य करार झाला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईत हा कार्यक्रम झाला. हा उपक्रम महाराष्ट्राच्या ऊर्जा निर्मिती धोरणाचा मुख्य आधारस्तंभ आहे असं फडणवीस म्हणाले. शाश्वत आणि हरित उर्जा निर्मितीद्वारे राज्याच्या ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचण्याच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी हे महत्वाचं पाऊल असल्याचं त्यांनी सांगितलं. या कराराच्या माध्यमातून राज्यात 24 हजार 631 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे; याद्वारे 5 हजार 630 मेगावॅट क्षमतेच्या वीजनिर्मितीचं उद्दीष्ट असून 10 हजार 300 जणांना रोजगार मिळेल असा अंदाज आहे.

**<u>एनआयआरएफ</u>**

2024 या वर्षासाठी जाहीर झालेल्या शैक्षणिक संस्थांसाठीच्या राष्ट्रीय गुणवत्ता यादीत आयआयटी मद्रास प्रथम क्रमांकावर असून आयआयटी मुंबईला तिसरं स्थान मिळालं आहे. काल केंद्रिय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नवी दिल्लीत ही यादी जाहीर केली. एकंदर 16 श्रेणींमध्ये ही क्रमवारी जाहीर करण्यात आली. या गुणवत्ता यादीत राज्य पातळीवरील विद्यापीठांच्या श्रेणीत पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानं तिसरा क्रमांक मिळवला आहे. याव्यतिरिक्त, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानं अन्य एका श्रेणीत 37 वं स्थान मिळवलं असून विद्यापीठ श्रेणीमध्ये 23 वा क्रमांक मिळवला आहे.

**<u>हरघरतिरंगा</u>**

स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत हिंगोली इथं काल सकाळी तिरंगा फेरी काढण्यात आली. यामध्ये प्रशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांसह नागरिक सहभागी झाले होते. नाशिकमध्ये जलसंपदा विभागामार्फत गंगापूर धरणावर तिरंग्याच्या रंगांची विद्युत रोषणाई करण्यात येणार असून, धरणाच्या सांडव्यावर तिरंगा लेझर शो आयोजित करण्यात आला आहे. पालघर जिल्ह्यात वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागानंही काल तिरंगा दुचाकी फेरी काढली होती.

**<u>दहावीबारावी</u>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुढच्या वर्षी फेब्रुवारी-मार्च महिन्यात घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या संभाव्य तारखा काल मंडळानं जाहीर केल्या. दर वर्षीच्या तुलनेत 2025 च्या परीक्षा आठ ते दहा दिवस लवकर घेण्यात येणार आहेत. बारावीची लेखी परीक्षा 11 फेब्रुवारी ते 18 मार्च; तर दहावीची परीक्षा 21 फेब्रुवारी ते 17 मार्च या कालावधीत घेण्याचं नियोजन आहे. या तारखांबाबत काही हरकती किंवा सूचना असतील, तर त्या येत्या 23 ऑगस्टपर्यंत कळवाव्यात, असं मंडळाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<u>वावडी महोत्सव</u>**

सोलापूर जिल्ह्यात माळशिरस तालुक्यातल्या निमगाव मगरांचे याठिकाणी नुकतंच वावडी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. सामाजिक संदेश देणाऱ्या या महोत्सवातून ग्रामीण भागातल्या गोरगरीब, शेतमजूर महिलांनाही स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून दिलं जातं. याबाबत अधिक माहिती देताना संयोजक निनाद पाटील म्हणाले.....

**<u>बालरंगभूमी</u>**

लोककलेची माहिती आणि महती नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशानं बालरंगभूमी परिषदेनं जल्लोष लोककलेचा हा लोककला महोत्सव आयोजित केला आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात 20 जिल्ह्यात हा महोत्सव आयोजित केल्याची माहिती परिषदेच्या अध्यक्ष ऍडव्होकेट नीलम शिर्के सामंत यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. या उपक्रमाअंतर्गत बीडमध्ये येत्या 17 ऑगस्टला जिल्हा लोककला महोत्सव होणार आहे असं बालरंगभूमी परिषदेच्या बीड जिल्हाध्यक्ष डॉक्टर दीपा क्षीरसागर यांनी कळवलं आहे.

**<u>कावडयात्रा</u>**

मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे; अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिली. केंद्र सरकारच्या मदतीने मराठवाड्यातील नदीजोड प्रकल्प राज्य शासन पूर्णत्वास नेऊन मराठवाड्याला समृद्ध करणारच असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हिंगोलीमध्ये आयोजित कावड यात्रेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, यासह राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचं आवाहन उपस्थितांना केलं.

**<u>हवामान</u>**

राज्यात सर्वत्र पावसाचा जोर कमी झाला असून येत्या 24 तासात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.